# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः 21.11.2024** **वारःगुरुवार**

---

**ठळक बातम्या,**

१. विधानसभा निवडणुकीत किरकोळ अपवाद वगळता सर्वत्र शांततेत 65 पूर्णांक 11 टक्के मतदान, 2019 च्या तुलनेत उच्चांक, पुणे जिल्ह्यातील 21 जागांसाठी 61 टक्के मतदान,

२. कोल्हापूर जिल्ह्यात सर्वाधिक तर मुंबई शहरात सर्वात कमी मतदान

३. अनेक मतदान केंद्रांवर आकर्षक सजावटीसह संस्कृतीबाबत आणि सामाजिक संदेश देणारे देखावे

४. नव्वदी पार केलेल्या अनेक नागरिकांचं मतदान केंद्रात जाऊन मतदान, चित्रपट आणि क्रीडा क्षेत्रातल्या मान्यवरांनीही बजावला मतदानाचा हक्क

५. 55 व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची दिमाखदार सुरुवात

आणि

६. महिलांच्या आशियाई अजिंक्यपद हॉकी स्पर्धेत तिसऱ्यांदा विजेतेपद मिळवत भारतीय संघानं रचला इतिहास

**मतदान**

गेल्या 22 ऑक्टोबर रोजी सुरू झालेली राज्यातल्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची प्रक्रिया काल पार पडली. 288 मतदारसंघातल्या उमेदवारांच्या भवितव्याबाबतच्या आशा आकांक्षा मतपेटीत बंद झाल्या. राज्यात विविध राजकीय पक्षांचे आणि अपक्ष असे एकंदर 4136 उमेदवारांनी ही निवडणूक लढवली. यामध्ये पक्षांची संख्या जवळपास राजकीय पक्षांच्या उमेदवारांइतकीच होती. राज्यात सर्वत्र शांततेत मतदान पार पडल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत सरासरी 65 पूर्णांक 11 शतांश टक्के मतदान झाल्याची नोंद आहे. राज्यात सर्वाधिक 76 पूर्णांक 25 टक्के मतदानाची नोंद कोल्हापूर जिल्ह्यात झाली. तर सर्वात कमी 52 पूर्णांक 7 दशांश टक्के मतदानाची नोंद मुंबई शहरात झाली. नांदेड लोकसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी संध्याकाळी 5 वाजेपर्यंत 53 पूर्णांक 78 टक्के मतदान झाल्याचं वृत्त आहे.

**मान्यवर मतदान**

विविध क्षेत्रातील नामवंतांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत, ज्येष्ठ गायिका आशा भोसले, माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम, मुंबईचे पोलिस आयुक्त विवेक फणसळकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी आपापल्या मतदारसंघात मतादानाचा हक्क बजावला. हेमामालिनी, नाना पाटेकर, शाहरुख खान, रितेश आणि जिनिलिया देशमुख, राकेश रोशन, अक्षय कुमार, कार्तिक आर्यन, राजकुमार राव यांच्यासह मराठी आणि हिंदी चित्रपट सृष्टीतल्या अनेक कलाकारांनी मतदान केलं. याशिवाय खासदार, आमदार, वरिष्ठ अधिकारी यांनीही त्यांच्या मतदारसंघात जाऊन  मतदान केलं.

## मतदान केंद्र

पालघर जिल्ह्यात मल्याण इथं मतदान केंद्रावर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारे फलक लावण्यात आले होते. विक्रमगड मतदारसंघात आदिवासी संस्कृतीचं दर्शन घडवणारं मतदान केंद्र तयार करण्यात आलं होतं.

पिंपरी चिंचवड महापालिकेनं दृष्टीहीन मतदारांसाठी ब्रेल लिपीची विशेष सोय केली होती. मुंबईत अंधेरीतल्या वेसावे इथं कोळीवाड्याच्या संकल्पनेवर आधारित मतदान केंद्रात कोळी समाजाच्या संस्कृतीचं दर्शन घडवणारा देखावा साकारण्यात आला होता. तर जोगेश्वरी पूर्व मतदारसंघात हिंदी चित्रपटसृष्टी या संकल्पनेवर मतदान केंद्र उभारण्यात आलं होतं. चित्रपटाची रिळं, फलक, कॅमेरा इत्यादींनी हे मतदान केंद्र सजवण्यात आलं होतं. रत्नागिरी जिल्ह्यात खेडशी इथं दिव्यांग विशेष मतदान केंद्र उभारण्यात आलं होतं. या मतदान केंद्रातले काही कर्मचारीदेखील दिव्यांग होते. जिल्ह्यात अनेक ठिकाणी मतदानासाठी रांगा लागल्या होत्या. त्यात महिलांचं प्रमाण लक्षणीय होतं. तसंच ज्येष्ठ नागरिकांमध्येही उत्साह दिसून येत होता. गुहागर मतदारसंघात आवाशी इथं उभारण्यात आलेल्या दिव्यांग मतदान केंद्रात अनेक दिव्यांगांनी मतदान करून छायाचित्र काढलं.

## वृद्ध नागरिक मतदान

रत्नागिरी जिल्ह्यात दापोली तालुक्यात 104 वर्षांचे रामचंद्र साळवी यांच्यासह वयाच्या 98 व्या वर्षी वैद्यकीय सेवा देणारे डॉक्टर मधुकर लुकतुके यांनी मतदानाचं कर्तव्य बजावलं. हिंगोली जिल्ह्यात आखाडा बाळापूर इथं दृष्टी गमावलेल्या, चालू न शकणाऱ्या 95 वर्षांच्या आजींनी नातवाच्या मदतीनं मतदान केंद्रावर जाऊन मतदान केलं. नांदेड जिल्ह्यात उमरी इथं 105 वर्षांच्या आजी शशिकला टिप्रेसवार यांनी मतदान केंद्रावर जाऊन मतदान केलं. गडचिरोली जिल्ह्यात गोविंदपूर इथं 111 वर्षांच्या फुलमती सरकार यांनी उत्साहात आपला मतदानाचा हक्क बजावला. प्रशासनानं त्यांच्यासाठी वाहन आणि चाकाच्या खुर्चीची व्यवस्था केली होती. मतदानानंतर त्यांचा सत्कारही करण्यात आला.

**मतदान अनुचित घटना**

मतदानादरम्यान काही ठिकाणी अनुचित घटना घडल्याचंही वृत्त आहे. नाशिक जिल्ह्यातल्या नांदगाव मतदारसंघातले शिवसेनेचे उमेदवार सुहास कांदे यांनी अपक्ष उमेदवार समीर भुजबळ यांना जीवे मारण्याची धमकी दिली.मुंबईतल्या दिंडोशी मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये मारामारी झाली. तर वर्धा जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदच्चंद्र पवार पक्षाचे नितेश कराळे यांना मारहाण झाली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वैजापूर मतदारसंघात महायुतीचे उमेदवार रमेश बोरनारे यांच्या गाडीवर दगडफेक करण्यात आल्याचं वृत्त आहे. सोलापूर जिल्ह्यातल्या सांगोला इथं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये किरकोळ वाद झाला. ठाणे जिल्ह्यातल्या कोपरी पाचपाखाडी मतदारसंघातले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार केदार दिघे यांच्या विरोधात मद्य आणि पैसे वाटप केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यात धर्मापुरी इथं मतदान केंद्रातले सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचा प्रकार घडला. मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून हे कॅमेरे पुन्हा पूर्ववत सुरू केले. जिल्ह्यात घाटनांदूरसह चोथेवाडी, मुरंबी आदी गावात वाहनावर हल्ला, व्हीव्हीपॅट यंत्रांची तोडफोड केल्याचा प्रकार घडला. हिंगोली जिल्ह्यात बाळापूर इथं मतदान केल्याची ध्वनीचित्रफीत मतदान कक्षात तयार करुन व्हॉटसऍपवर पाठवल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

**मतदान बहिष्कार**

मेळघाटातल्या रंगुबेली, खामडा - किन्हीखेडा, धोकरा, कुंड आणि खोकमार या गावातल्या नागरिकांनी विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार घातला.  रस्ते, वीज आणि शुद्ध पिण्याचे पाणी या समस्या प्रशासन आणि लोकप्रतिनिधी सोडवू शकले नाहीत. त्यामुळे मागण्या पूर्ण होईपर्यंत मतदान होणार नाही, असा निर्णय इथल्या ग्रामस्थांनी घेतला आहे. त्यामुळे या गावांमध्ये शून्य टक्के मतदान झालं. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या कन्नड तालुक्यातल्या रामनगर गावातल्या ग्रामस्थांनीही पायाभूत सुविधांच्या अभावामुळे मतदानावर बहिष्कार घातल्याचं वृत्त आहे.

**झारखंड मतदान**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात काल संध्याकाळी पाच वाजेपर्यंत 68 पूर्णांक 45 शतांश टक्के मतदान झाल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. जमतारा जिल्ह्यात सर्वाधिक 77 पूर्णांक 29 टक्के मतदान झालं. 2019 च्या तुलनेत हा उच्चांक आहे.

**निलंबन**

निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर उत्तर प्रदेशात पोटनिवडणूक मतदानाच्या वेळी निवडणूक आचारसंहितेचं उल्लंघन केल्याप्रकरणी एका पोलिस कर्मचाऱ्याला निलंबित करण्यात आलं. कानपूर जिल्ह्यात सिसमाउ मतदारसंघात हा कर्मचारी मतदात्यांची तपासणी करत होता आणि त्यांना मतदान करण्यापासून थांबवत होता असं आढळून आलं आहे. उत्तर प्रदेशमध्ये काल 12 विधानसभा मतदारसंघांसाठी पोटनिवडणूक झाली.

**इंडिया कॉप 29**

विकसनशील देशांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी सहमती दर्शवलेल्या आश्वासनांची पूर्तता विकसित देशांनी करावी असं आवाहन भारतानं काल कॉप 29 या हवामानविषयक जागतिक परिषदेत केलं. विकसित देशांमध्ये मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जन होतं. त्यामुळे जागतिक तापमानवाढ आणि हवामानातले अनियमित बदल घडून येत आहेत आणि त्याचा सर्वाधिक फटका विकसनशील देशांना सहन करावा लागतो. विकसनशील देशांतल्या लोकांचं जगणं आणि आयुष्य यामुळे धोक्यात येत असल्याचं भारतानं कॉप 29 मधील उच्च स्तरीय मंत्री परिषदेत निवेदनाद्वारे सांगितलं.

**इफ्फी**

55 व्या भारतीय आंतरराष्ट्रीय  चित्रपट महोत्सवाचा अर्थात इफ्फीचा काल गोव्यात शानदार सोहळ्यानं प्रारंभ झाला. या सोहोळ्यात हिंदी चित्रपट सृष्टीतल्या कलाकारांनी नाइनटीज रिवाइंड, टाइमलेस सोल्स असे अत्यंत देखणे कार्यक्रम सादर केले. टाइमलेस सोल्स या कार्यक्रमातून राज कपूर, मोहम्मद रफी  यांच्यासारख्या दिग्गजांना आदरांजली अर्पण करण्यात आली. उद्घाटनाच्या कार्यक्रमात वेव्हज या प्रसार भारतीच्या ओटीटी मंचाचं उद्घाटन करण्यात आलं. या ओटीटी मंचाद्वारे विविध भाषांमधल्या वृत्त, मनोरंजन, चित्रपट वाहिन्या प्रेक्षकांना पाहता येतील.

**बॅडमिंटन**

चीनमध्ये शेनझेन इथं सुरू असलेल्या चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय बॅडमिंटनपटू पी व्ही सिंधू, मालविका बनसोड यांनी महिला एकेरीच्या आणि लक्ष्य सेननं पुरुष एकेरीच्या उप उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

**हॉकी**

महिलांच्या आशियाई अजिंक्यपद हॉकी करंडक स्पर्धेचं विजेतेपद भारतीय संघानं पटकावलं आहे. भारताच्या महिला हॉकी संघानं तिसऱ्यांदा आशियाई अजिंक्यपद करंडकावर आपलं नांव कोरत ऐतिहासिक कामगिरी केली. बिहारमध्ये राजगीर इथं झालेल्या अंतिम सामन्यात काल भारतीय संघानं चीनच्या संघावर 1-0 अशी मात केली. सामन्याच्या पूर्वार्धात एकही गोल होऊ शकला नाही. मात्र उत्तरार्धात अधिक आक्रमक खेळ करत भारतानं विजय मिळवला. अंतिम सामन्यात विजयी गोल करणाऱ्या दीपिकानं या स्पर्धेत एकंदर 11 गोल केले आहेत.

**हवामान**

विदर्भ, मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रात थंडी वाढली असून तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत काहीशी घट झाली आहे. सर्वात कमी किमान तापमान काल पुण्यात 12 पूर्णांक 2अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.